पान १ वरून

..तर दुकानं नाही, ..

फडणवीस जी, तिसरी भाषा सक्तीची आणणार म्हणजे आणणार. तुम्ही पहिली ते पाचवी हिंदी आणण्याचा प्रयत्न तर करून बघा. दुकानं नाही, शाळाही बंद करेन.' अशा थेट इशारा राज ठाकरेंनी सरकारला दिला आहे. राज ठाकरे पुढे बोलताना म्हटले की, महाराष्ट्राचा मुख्यमंत्री हिंदीसाठी भांडतोय, महाराष्ट्रासाठी मराठी सक्तीची. इतर शाळात मराठी सक्तीची केली पाहिजे. ते सोडून हिंदी सक्तीची करत आहात. कोणाच्या दबावाखाली. कोण दबाव टाकतं तुमच्यावर. केंद्राचं हे पूर्वीपासूनचं आहे. काँग्रेस असल्यापासूनचं हे सगळं आहे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला. त्याचा प्रचंड मोठा लढा झाला. मुंबई महाराष्ट्रापासून बाजूला करण्याचा डाव होता. अत्रेंचा पुस्तक वाचत असताना मला धक्का बसला. मुंबई महाराष्ट्राला मिळू नये हे पहिलं वल्लभभाई पटेलांनी सांगितलं. वल्लभभाई पटेलांनी. त्यांना लोहपुरुष म्हणून मानत आलो. देशाचे गृहमंत्री. तुम्ही महाराष्ट्राला विरोध केला. ज्या ज्या वेळी महाराष्ट्रात आंदोलन झाली. तेव्हा मोरारजी देसाई यांनी गोळीबार करून मराठी माणसाला ठार मारलं. अनेक वर्षापासून त्यांचा मुंबईवर डोळा आहे. सहज होत नाही. हे चाचपडून पाहत आहे. हिंदी भाषा आणली बघू महाराष्ट्र विरोध करतो का. मराठी माणूस पेटतोय का. तो शांत दिसला तर हिंदी भाषा आणणं ही त्यांची पायरी असेल. हळूहळू मुंबई ताब्यात घ्यायची आणि गुजरातला द्यायची ही त्यांची स्वप्न आहेत असंही राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

'निरामय'ची रौप्य...

आयोजन केले होते. या अर्धदिवसीय कार्यक्रमामध्ये मुंबई तसेच आजूबाजूच्याशहरांतील४०हूनअधिकस्वयंसेवीसंस्थासहभागीझाल्या. या कार्यक्रमाचा उद्देश जीवनचक्राच्या विविध टप्प्यांवर आहाराचा आरोग्य आणि एकूण कल्याणावर होणारा परिणाम, एनजीओंना भेडसावणाऱ्या सामान्य अडचणी, शाश्वत विकासासाठी शासन आणि एनजीओ यांच्यातील भागीदारीच्या रणनीती, तसेच क्षयरोगावरील (टीबी) नवीन हस्तक्षेप यावर चर्चा करणे हा होता. कार्यक्रमास मुख्य अतिथी म्हणून श्री डॉ. दक्षा शाह (कार्यकारी आरोग्य अधिकारी, महापालिका) उपस्थित होते. यावेळी मान्यवर वक्त्यांमध्ये डॉ. प्रसन्ना पाटील (सावित्रीबाई फुले एकात्म समाज मंडळ, संभाजीनगर), डॉ. नेहा नलवडे (डब्ल्यूएचओ सल्लागार), डॉ. अल्का जाधव (बालरोगतज्ज्ञ), डॉ. सफला श्रॉफ (स्त्रीरोगतज्ज्ञ), डॉ. विनया वैशंपायन (प्रमुख, बीएमएन महाविद्यालय) आणि डॉ. वीणा यार्डी (पोषणतज्ज्ञ) यांचा समावेश होता. त्यांनी आपले अनुभव आणि अभ्याससिद्ध माहिती सहभागी संस्थांसोबत शेअर केली. निरामया हेल्थ फाउंडेशनच्या मानद संचालिका सौ. शुभलक्ष्मी पटवर्धन यांनी संस्थेच्या २५ वर्षांच्या उल्लेखनीय कार्ययात्रेची माहिती दिली आणि समाजातील वंचित घटकांसाठी आरोग्य व पोषण क्षेत्रात केलेल्या कार्याचा आढावा घेतला. या प्रसंगी रोटरी क्लब चे अधिकारी राजेश चौधरी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, '' समाजातील अश कुपोषित घटकांच्या पून पूनरूथहानासाठी रोटरी क्लब अनेक संस्थांच्या माध्यमातून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी समन्वयक म्हणून जबाबदारी पार पाडत असून संस्थेच्या प्रयत्नातून पालघर, वाडा जव्हार अशा भागात मोबाईल डिस्पेन्री हा उपक्रम राबवित असल्याचे सांगितले. या एन जी ओ मिट कार्यक्रमाचा समारोप एनजीओ आणि सरकारी यंत्रणांमधील सहकार्य अधिक बळकट करण्याच्या सामूहिक निर्धाराने करण्यात आला.

चाळीसगावात महाविकास...

आधीच तालुक्यात गलितगात्र असणाऱ्या महाविकास आघाडीला हा मोठा धक्का मानला जात आहे. जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुका हा आमदार मंगेश चव्हाण यांच्या कार्याचा पॅटर्न झाला असून त्यांनी रेकॉर्ड ब्रेक कामगिरी केली आहे. विधानसभा निवडणुकीत देखील त्यांनी जळगाव जिल्ह्यात सर्वाधिक मताधिक्य घेऊन नवा विक्रम केला आहे. आता असंख्य कार्यकर्ते भाजपमध्ये प्रवेश करत असल्याने चाळीसगाव तालुक्यात भाजपचे काम अधिक जोमाने व भक्कमपणे होईल. त्यामुळे पुढील निवडणुकांमध्ये राज्यात सर्वाधिक मताधिक्य चाळीसगाव मधून आमदार मंगेश चव्हाण यांना मिळेल असा विश्वास मंत्री गिरीश महाजन यांनी यावेळी व्यक्त केला. प्रवेश केलेल्या पदाधिकारी, कार्यकर्ते यांचे नाव व पद - १) भगवान अमरसिंह पाटील (माजी उपनगराध्यक्ष, रा. श. प.) २) भूषण काशिनाथ पाटील (माजी जिल्हा परिषद सदस्य, रा. श. प.) ३) दीपक कच्छवा (वरखेडे) ४) दीपक पवार (टाकळी प्रदे) ५) उदय वाघ (चाळीसगाव) ६) हितेश व्यास (चाळीसगाव)

नगरपरिषदेकडून निर्माल्य...

१५ घंटागाड्यांना विशेष क्रमांक देऊन त्यांच्यावर निर्माल्यसाठी स्वतंत्र बॅग लावण्यात आली आहे, जेणेकरून निर्माल्य इतर कचऱ्यात मिसळणार नाही. ''निर्माल्य हे केवळ कचरा नाही, तर श्रद्धेचा सुगंध दरवळवणारा ठेवा आहे. जर ते काळजीपूर्वक संकलित केले, तर निसर्गालाही श्वास घेता येतो. या निर्माल्यापासून सेंद्रिय खत तयार करणे आणि महिला बचत गटांना प्राधान्य देऊन अगरबत्ती निर्मिती करणे हीच खरी सामाजिक सेवा आहे. या पवित्र कार्यात सर्व पुजारीगणांनी / नागरीकांनी पुढाकार घ्यावा, कारण त्यांच्या शब्दांना समाजात आदराने मानले जाते. '' असे कार्यक्रमाप्रसंगी मुख्याधिकारी श्री. राहुल पाटील यांनी प्रतिपादन केलेले आहे. उपस्थित मान्यवर श्यामभाऊ, प्रवीण चौधरी, सुनील नाईक यांनी आपल्या मनोगतातून या उपक्रमाचे स्वागत करत नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचे आश्वासन दिले. पत्रकार उमेश नगराळे यांनी या अभिनव संकल्पनेचे कौतुक करत त्यास प्रसारमाध्यमांतून व्यापक पोच देण्याचे आश्वासन दिले.

बदनापूरमध्ये ढगफुटी सदृश्य पावसाने हाहाकार

लोकशाही न्यूज नेटवर्क
जालना ✍ प्रतिनिधी

जिल्ह्यात काल सर्वदूर जोरदार पावसाने हजेरी लावली. १५ ते २० दिवसाच्या विश्रांतीनंतर काल जिल्ह्याच्या विविध भागात पावसाचं जोरदार पुनरागमन झाले. काही ठिकाणी या पावसामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला तर काही ठिकाणी शेतकऱ्यांची पिकं पाण्याखाली गेल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. बदनापूर तालुक्यातल्या अकोला गावात मध्यरात्रीच्या सुमारास मुसळधार पावसाने हजेरी लावल्यामुळे शेतकऱ्यांची मोसंबी डाळिंब या फळबागांसह खरीप हंगामात लागवड केलेल्या कपाशी आणि सोयाबीन ही पिके पूर्णतः पाण्या खाली गेल्याने या शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालंय. दरम्यान एकीकडे हा पाऊस शेतकऱ्यांना दिलासादायक ठरला असला तरी दुसरीकडे मात्र या पावसाने हाहाकार करून शेतकऱ्यांचा प्रचंड नुकसान केलंय. त्यामुळे सरकारने तात्काळ नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी करण्यात येत आहे.

साकळी ग्रामपंचायत मार्फत १०० वृक्षांचे वृक्षारोपण

लोकशाही न्यूज नेटवर्क
मनवेल ता. यावल ✍ प्रतिनिधी

साकळी येथील ग्रामपंचायत मार्फत लोकनियुक्त सरपंच दीपक पाटील यांच्या व्यापक दृष्टिकोनातून गावात वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. नेहमीप्रमाणे लहान झाड न आणता पाच वर्ष वयाचे व १२ फुट उंचीचे १०० झाडे आणून ते गावात विविध सार्वजनिक जसे की शाळा, धार्मिक स्थळे, सार्वजनिक मोकळी जागा, वापररस्त्यालगत ठिकाणी लावण्यात आलेले आहे. या आगळ्यावेगळ्या उपक्रमाने येत्या पुढील काळात आपले गाव हरित गाव म्हणून ओळखले जाईल. याप्रसंगी लोकनियुक्त सरपंच दिपक पाटील, माजी ग्रा. पं. सदस्य साहेबराव बडगुजर, शरद बिराडे, ग्रामपंचायत सदस्य, परमानंद बडगुजर, फक्रुद्दीन कुरेशी, शे अकबर शे हुसेन, खतीब तडवी, मुकेश बोरसे, नरेंद्र मराठे यांचे सह सामाजिक कार्यकर्ते उमेश बडगुजर, शे. सलीम शे. मजीद, मुकेश खेवलकर, फैसलखान फारूखखान, शाहरुख खान, पंकज जैन, नाना भालेराव, भुरा भिल्ल व परिसरातील नागरिक उपस्थित होते. वृक्षारोपणाचा उपक्रम ज्या-ज्या वेळेस शक्य होईल त्या त्यावेळी सातत्याने राबवला जाईल. तसेच जास्त वयाचे वृक्ष आणून ते व्यवस्थित जगण्यासाठी काळजी घेतली जाईल. असे सरपंच दिपक पाटील यांनी सांगितले.

माध्यमिक विद्यालयात विद्यार्थी सुरक्षाविषयक मार्गदर्शन

लोकशाही न्यूज नेटवर्क
चाळीसगाव ✍ प्रतिनिधी

हिंगोणे खूर्द येथील माध्यमिक विद्यालयात विद्यार्थी सुरक्षाविषयक मार्गदर्शन सत्राचे आयोजन विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. पी. पाटील यांच्या अध्यक्षतेत करण्यात आले. चाळीसगाव ग्रामीण पोलीस स्टेशनचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकरराव मुटेकर यांनी गुड टच-बॅड टच, विद्यार्थींनी सुरक्षा, सोशल मिडीया वापरतांना घ्यावयाची खबरदारी, वाहतूक नियम, व्यसनमुक्ती व बाल सुरक्षा कायदेविषयक सखोल मार्गदर्शन केले. याप्रसंगी संदीप पाटील (पोलीस हवालदार), तुषार चव्हाण (माजी सरपंच), रावसाहेब चव्हाण (सामाजिक कार्यकर्ते) यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जे. जी. शेलार यांनी केले. ए. टी. पवार यांनी सुरेख फलक लेखन केले. सुत्रसंचलन एस. आर. देशमुख यांनी तर आभारप्रदर्शन सी. बी. सोनवणे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी बी. व्ही. चव्हाण, एल. एम. पाटील व बी. एस. बोरसे यांचे अनमोल सहकार्य लाभले.

न्युझीलंडने झिम्बाब्वेला आठ विकेटने नमवले

नवी दिल्ली – झिम्बाब्वेमध्ये सुरु असलेल्या ट्राय सिरीज मालिकेतील चौथा सामना न्यूझीलंड आणि झिम्बाब्वे यांच्यात पार पडला. या सामन्यात नाणेफेकीचा कौल न्यूझीलंडने जिंकला आणि प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. झिम्बाब्वेने २० षटकात ७ गडी गमवून १२० धावा केल्या आणि विजयासाठी १२१ धावा दिल्या. हे आव्हान न्यूझीलंडने १३.५ षटकात २ गडी गमवून पूर्ण केलं. वेस्ली मधवेरे झिम्बाब्वेकडून सर्वाधिक ३६ धावा केल्या.

मंगरूळ येथे लाभार्थ्यांना सन्मानाने भांडे वाटप

आ. अनिल पाटील यांनी लक्ष घातल्याने कामगारांचे समाधान

लोकशाही न्यूज नेटवर्क
अमळनेर ✍ प्रतिनिधी

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ योजनेअंतर्गत भांडे वाटप कार्यक्रमात गेल्या तीन चार दिवसांपासून मोठा गोंधळ उडून लाभार्थ्यांना भांडे न मिळता खाली हात परतावे लागत असताना आमदार अनिल पाटील यांनी यात लक्ष घातल्याने मंगरूळ (ता. अमळनेर) येथे काल शांततेत व सन्मानाने भांडे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात मा. जिल्हा परिषद सदस्या सौ. जयश्री अनिल पाटील यांच्या हस्ते लाभार्थ्यांना जीवनोपयोगी भांड्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमावेळी स्थानिक कार्यकर्ते, पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सौ. जयश्री पाटील यांनी कामगार कल्याणासाठी शासन राबवत असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. अशा योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ग्रामस्तरावर जनजागृती होणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कामगारांचे सशक्तीकरण आणि सामाजिक सुरक्षेसाठी शासन कटिबद्ध आहे, आणि त्याचा थेट लाभ कुटुंबांपर्यंत पोहोचवणे हाच आमचा हेतू असल्याचे त्या म्हणाल्या. सन्मानाने भांडे मिळाल्याने सर्वांनी आमदार पाटील यांचे आभार व्यक्त केले. दरम्यान यापुढे कोणताही गोंधळ होऊ नये यासाठी एका दिवशी २५० लाभार्थ्यांना भांडे वाटप करण्यात येणार असून ज्यांची नावे असेल त्यांनीच भांडी घेण्यासाठी उपस्थित राहावे त्याव्यतिरिक्त कुणीही येऊ नये असे आवाहन करण्यात आले आहे.

हिंदुस्थानचा राष्ट्रध्वज तिरंगा नव्हे भगवा आहे तो लाल किल्ल्यावर फडकवणार

लोकशाही न्यूज नेटवर्क
कोल्हापूर ✍ प्रतिनिधी

शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे अध्यक्ष संभाजी भिडे यांनी कोल्हापूरात बोलताना मोठं विधान केलं आहे. हिंदुस्थानचा राष्ट्रध्वज तिरंगा नसून भगवा असल्याचे संभाजी भिडे यांनी म्हटलं आहे. यामुळे वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

निधन वार्ता

अमोल व्यवहारे

लोकशाही न्यूज नेटवर्क
शिंदाड ता पाचोरा ✍ प्रतिनिधी

येथील ग्रामपंचायत ऑपरेटर अमोल राजेंद्र व्यवहारे (वय ३१) वर्ष यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, मुलगी असा परिवार आहे.

यशोदाबाई बारी

लोकशाही न्यूज नेटवर्क
वरणगाव ✍ प्रतिनिधी

शहरातील गांधी चौक परिसरातील रहिवाशी यशोदाबाई भिला बारी (वय ८०) यांचे दि १८ शुक्रवार रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सुन, नातवंडे असा परिवार असुन ते रमेश बारी यांच्या आत्या तर प्रकाश बारी यांच्या मातोश्री होत.

विजयसिंग परदेशी

लोकशाही न्यूज नेटवर्क
चाळीसगाव ✍ प्रतिनिधी

सप्तशृंगी नगर टाकळी प्र. चा. येथील रहिवासी संदेश विजयसिंग परदेशी व श्री. जयदिप विजयसिंग परदेशी (वाडे ता. भडगाव) यांचे वडील सेवानिवृत्त मुख्याध्यापक कै. विजयसिंग शांतिलाल परदेशी यांचे दि. १७ गुरूवार रोजी दुपारी ४:०० वाजता हृदयविकाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा दि. १८/०७/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी ठिक ९:३० वाजता त्यांच्या मुळगावी वाडे ता. भडगाव येथील राहत्याघरुन निघाली.

जाहिर नोटिस

ॲड.आर. बी. सुरलकर

जामनेर येथील सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, जामनेर जि. जळगांव यांच्या न्यायालयात

न्यायालयातील **दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १४७/२०२५**

चौकशी तारीख-२९/०८/२०२५ निशाणी क्र.७

अर्जदार : १)हबीदाबाई अल्लाउद्दीन तडवी, उ.व.७०, धंदा-घरकाम/मजूरी, २) आरस्तुल अल्लाउद्दीन तडवी, उ.व.६८, धंदा-मजूरी, ३) सकरुद्दीन अल्लाउद्दीन तडवी, उ.व. ४८, धंदा -मजुरी नं १ व ३ रा हिवरी दिगर ता. जामनेर जि. जळगाव ४) जिलानी अल्लाउद्दीन तडवी उ. व. ४६, धंदा- मजुरी, ५) अमिनाबी कमरुद्दीन तडवी, उ.व ४०, धंदा- मजुरी नं २.४ व ५ रा. पिंपळगाव बु ता. जामनेर जि.जळगाव.६) जरिनाबी हानीफ तडवी उ. व. ३९ धंदा मजुरी,रा.मांडवे खुर्द ता. जामनेर जि. जळगाव ७) मुनाबाई बिलाल तडवी उ.व. ४५,धंदा मजूरी,रा.हिवरे दिगर ता. जामनेर, जि. जळगाव ८)सलमाबी मस्तान तडवी उ.व. ४४ धंदा मजुरी,रा वाकोद ता. जामनेर जि. जळगाव ९)मदिना शरीफ तडवी उ.व.३८ धंदा मजुरी रा. पिंपळगाव बु. ता. जामनेर जि. जळगाव १०)नगीना साबिर तडवी,उ.व. ३४ धंदा मजुरी रा. ढालगाव ता. जामनेर जि. जळगाव. ११)महेराज इस्माईल तडवी, उ. व. ३३ धंदा मजुरी रा. शेंदुर्णी ता. जामनेर जि. जळगाव ..

// विरुद्ध //....कोणीही नाही....सामनेवाला....अर्ज -बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट कलम प्रमाणे कायदेशीर वारस ठरवून मिळणेकरीता अर्ज...या कामी अर्जदारातर्फे मे. कोर्टात अर्ज असा की, अर्ज - १) असे की, अर्जदार हे वर नमुद पत्यावरील कायमचे रहिवाशी असून आजही ते वर नमुद पत्यावर राहतात. तसेच अर्जदार यांनी सदरचा अर्ज मयत अल्लाउद्दीन समसोद्दीन तडवी यांचे वारस आहे असा वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. मयत अल्लाउद्दीन समसोद्दीन तडवी हे दि.०४/१०/२०२४ रोजी मौजे पिंपळगांव बु. ता.जामनेर जि. जळगांव येथे मयत झालेले असून अर्जदार नं.१ व २ हया मयत अल्लाउद्दीन समसोद्दीन तडवी यांच्या पत्नी असून मयत अल्लाउद्दीन समसोद्दीन तडवी यांना अर्जदार नं.१ ही पहिली पत्नी व अर्जदार नं.२ ही दुसरी पत्नी आहे. मयत अल्लाउद्दीन समसोद्दीन तडवी यांची आई यापुर्वीच मयत झालेली आहे. मयत अल्लाउद्दीन समसोद्दीन तडवी यांना अर्जदाराशिवाय अन्य दुसरे वारस नाही.

२) असे की, अर्जदार हे मयत अल्लाउद्दीन समसोद्दीन तडवी यांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदार यांना वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामी आवश्यक आहे परंतू अर्जदार नं.१ ते ११ यांचेजवळ वारस दाखला नसल्याने त्यांचे शासकीय व निमशासकीय कामे कोणत्याही प्रकारचे होत नाही. अर्जदार हे दि.०४/०७/२०२५ रोजी संबंधीत महसुल अधिकारी यांचेकडे वारस दाखला मिळणेसाठी गेले असता त्यांनी मे. न्यायालयातुन वारस दाखला आणण्याचे सांगितले, म्हणून अर्जदार हे मयत अल्लाउद्दीन समसोद्दीन तडवी यांचे कायदेशीर वारस असल्याने तसा वारस दाखला (legal hairship certificate) मिळणेसाठी अर्जदार याना सदरचा अर्ज या मे कोर्टात दाखल करणे भाग झाले आहे.

३) असे की, त्याअर्थी सदरील किरकोळ अर्जाचे कामी अर्जदार हे मयत अल्लाउद्दीन समसोद्दीन तडवी यांचे कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतीरीक्त आणखी कोणी वारस असल्यास योग्य तो पुरावा म्हणून दस्तऐवज व आपले लेखी म्हणणे देणेकामी स्वतः किंवा आपले वकीलांमार्फत मे. कोर्टात दि.२९/०८/२०२५ रोजी प्रत्यक्ष जाब देणेकामी व दस्-तऐवज दाखल करणेकामी स्वतः हजर रहावे. ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्कांबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशीर वारस असल्याबद्दलचे सर्टिफिकेट देईल.

आज दि. १७/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व मे. न्यायालयाचे शिक्यानिशी जाहीर नोटीस दिली असे

हुकूमावरुन

सही
क. लिपीक

सहा.अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर, जामनेर

साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

लोकशाही न्यूज नेटवर्क
पारोळा ✍ प्रतिनिधी

शहरातील टायगर इंटरनॅशनल स्कूल, येथे साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. तुकाराम भाऊराव साठे, ज्यांना अण्णाभाऊ साठे म्हणून ओळखले जाते, हे एक प्रख्यात समाजसुधारक, लोककवी व साहित्यिक होते. त्यांनी कथा, कादंबरी, लोकनाट्य, नाटक, पटकथा, लावणी, पोवाडे, प्रवास वर्णन अश्या विविध साहित्यप्रकारांमध्ये उल्लेखनीय लेखन केले आहे. समाजातील उपेक्षित, वंचित वर्गासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले. त्यांच्या साहित्याने आणि कार्याने त्यांना 'लोकशाहीर' ही गौरवमयी ओळख मिळाली. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्याची माहिती देण्यात आली आणि त्यांच्या प्रेरणादायी विचारांचे अनुकरण करण्याचा संदेश शाळेच्या वतीने देण्यात आला. कार्यक्रमासाठी शाळेचे अध्यक्ष रवींद्र पाटील, संचालिका रूपाली पाटील, प्राचार्य पी. एस. पाटील, अजीम शेख, उपप्राचार्या कविता सूर्यवंशी, विभागप्रमुख नम्रता बेडीस्कर व वृषाली पाटील, क्लार्क श्रीकांत खैरनार तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

जाहिर नोटिस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीतर्फे कळविण्यात येते की, माझा मुलगा शामसुंदर कैलास व्यास हा व्यसनाधीन झालेले असून त्याला मी घरातुन बेदखल केले आहे. तरी कोणीही त्याच्याशी कोणताही आर्थिक वा कोणताही व्यवहार करू नये केल्यास त्याची जबाबदारी माझ्यावर वा माझ्या कुटूंबावर राहार नाही.

कैलास काशिनाथ व्यास, जळगाव

नमुना क्र. ७५

जा.क्र.ACC-१/२१५५/२०२५
सार्वजनिक न्यासनोंदणी कार्यालय
पहिला मजला, युनिटी चेंबर्स
ख्याजा मियॉ चौक,गणेश कॉलनी रोड
जळगाव विभाग जळगाव
दिनांक ०२/०७/२०२५

चौकशी जाहिर नोटीस

नोंदणी अर्ज क्र. २३७/२०२५ कलम १८/१९

सार्वजनिक न्यासाचे नाव :- बौध्द पंचमंडळ चॅरिटेबल ट्रस्ट नायगाव ता. मुक्ताईनगर जि. जळगाव

अर्जदार - श्री संजय विश्वनाथ म्हसाने

व सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,सहा. धर्मदाय आयुक्त १ जळगांव विभाग, जळगांव हे वर नमुद केलेल्या नोंदणी अर्जा संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १८/१९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१]वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे ?

२] खाली निर्दीष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ] जंगम मिळकत [वर्णन] - ५००५/- मात्र [अक्षरी पाच हजार पाच रु.मात्र]

ब] स्थावर मिळकत [वर्णन] - काही नाही

वरील अर्जदाराने सदर न्यासाच्या बाबतीत मुंबई सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १८/१९ अन्वये नोंदणी अर्ज दाखल केलेला आहे.

तरी सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल, अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही, तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, जळगांव यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०१/०७/२०२५ रोजी दिली.

सहाय्यक धर्मदाय आयुक्त शिक्का **सही/-**
[श्री शक्तीकुमार रा.पाटील]
अधिक्षक [न्याय शाखा]
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
जळगाव विभाग, जळगाव

नमुना क्र. ७५

जा.क्र.ACC-१/२१५९/२०२५
सार्वजनिक न्यासनोंदणी कार्यालय
पहिला मजला, युनिटी चेंबर्स
ख्याजा मियॉ चौक,गणेश कॉलनी रोड
जळगाव विभाग जळगाव
दिनांक ०२/०७/२०२५

चौकशी जाहिर नोटीस

नोंदणी अर्ज क्र. २३६/२०२५ कलम १८/१९

सार्वजनिक न्यासाचे नाव :- पोकळ बरड भवानी माता मंदिर ट्रस्ट, पिंप्रीपंचम , ता.मुक्ताईनगर जि. जळगाव

अर्जदार - श्री नारायण सिताराम पाटील

व सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,सहा. धर्मदाय आयुक्त १ जळगांव विभाग, जळगांव हे वर नमुद केलेल्या नोंदणी अर्जा संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १८/१९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१]वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे ?

२] खाली निर्दीष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ] जंगम मिळकत [वर्णन] - ५,५११/- मात्र [अक्षरी पाच हजार पाच अकरा रु.मात्र]

ब] स्थावर मिळकत [वर्णन] - मौजे पिंप्रीपंचम,ता.मुक्ताईनगर,जि.जळगाव येथील अ.क्र.३१८,गट क्र.२४/१,मालमत्ता क्र.३०४, वरील पोकळ बरड भवानी माता मंदिर [लांबी ३५,रुंदी २५] १२२५ चौरस फुट यास चतु:सिमा पुर्व - फॉरेस्ट २४, पैकी पश्चिम -फॉरेस्ट, उत्तर- गट नं. २४/१ ग्रामपंचायत ,दक्षिण गट नं. २४/१ ग्रामपंचायत

वरील अर्जदाराने सदर न्यासाच्या बाबतीत मुंबई सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १८/१९ अन्वये नोंदणी अर्ज दाखल केलेला आहे.

तरी सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल, अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही, तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, जळगांव यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०१/०७/२०२५ रोजी दिली.

सहाय्यक धर्मदाय आयुक्त शिक्का **सही/-**
[श्री शक्तीकुमार रा.पाटील]
अधिक्षक [न्याय शाखा]
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
जळगाव विभाग, जळगाव